महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

दैनिक जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ ११ जून २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३४३ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# कोणतीही भाडेवाढ न करता सर्व लोकल वातानुकूलित करणार



## मुख्यमंत्र्यांनी सांगितला मुंबई लोकलसाठी मास्टर प्लॅन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ सोमवारी (दि.10) मोठा अपघात झाला. यात 4 प्रवाशांचा मृत्यू झाला. यावर आता रेल्वे बोर्डानं मुंबईत उपनगरीय वाहतुकीसाठी स्वयंचलित दरवाजे असणाऱ्या सध्या रेल्वे गाड्या सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या गाड्या जानेवारी 2026 पर्यंत सुरू करण्याचा रेल्वे बोर्डाचा मानस आहे. अशातच आता रेल्वे मंत्रालय मुंबईत उपनगरीय प्रवासी वाहतुकीसाठी सर्व गाड्या वातानुकूलित करण्याच्या मार्गावर असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. याबाबत आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केलं आहे. यासंदर्भात रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी अडीच तास बोलणं झाल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली आहे.

सोमवारी झालेल्या मुंब्रा येथील रेल्वे अपघाताबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी, मुख्यमंत्र्यांनी सरकार कोणत्या उपाययोजना करत आहे, याची माहिती पत्रकारांना दिली. मुख्यमंत्र्यांना एसी ट्रेनबाबत देखील प्रश्न विचारण्यात आला. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, "आम्ही मुंबईकरांना एसी लोकल देण्याच्या विचारात आहोत आणि त्या देखील कोणतंही भाडे वाढ न करता देण्याच्या विचारात आहोत." तसंच, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्यावर देखील टीका केली जात आहे. याबाबत ते म्हणाले, "रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव हे असंवेदनशील असल्याच्या बातम्या मी काही माध्यमांमध्ये पहिल्या. या बातम्या अर्थहीन आणि तथ्यहीन आहेत. सोमवारी हा अपघात झाल्यानंतर सायंकाळी रेल्वेमंत्री आणि मी जवळपास अडीच तास या अपघातासंदर्भात चर्चा केली," अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

### कालच्या घटनेतून आपल्याला शिकावं लागेल - देवेंद्र फडणवीस

दरम्यान, सरकार भाडे न वाढवता AC लोकल आणण्याच्या तयारीत आहे. एसी ट्रेन द्यायच्या आणि भाडं न वाढवता द्यायचा, तसा प्लान तयार केलेला आहे. मात्र कालच्या घटनेतून आपल्याला शिकावं लागेल. राज्य सरकार आणि केंद्र सरकार यासाठी प्रयत्न करुन मार्ग काढेल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. शासकीय कार्यालयांना फ्लेक्सी डायलूट दिलेला आहे. खासगी कार्यालयासंदर्भात अडचण येत आहे. पब्लिक ट्रान्सपोर्टसंदर्भात कपॅसिटी वाढवण्याचा प्रयत्न करु, असेही ते म्हणाले.

---

माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या प्रयत्नांना यश

## रखडलेल्या म्हाडा पुनर्विकास प्रकल्पाची गृहनिर्माण राज्यमंत्र्यांकडून गंभीर दखल



शहापूर :: नरेंद्र पाटील

कल्याण पश्चिमेच्या शांतीदूत सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या १४ वर्षांपासून रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पाची गृहराज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी गंभीर दखल घेतली आहे. कल्याण पश्चिमेचे माजी भाजप आमदार नरेंद्र पवार यांच्या पुढाकाराने मंत्रालयात एक महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. त्यामध्ये हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारी सर्वतोपरी मदत राज्य शासनाकडून उपलब्ध करून देण्याचे आश्वस्त करतानाच या प्रकल्पात रहिवाशांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांवरही कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी दिले आहेत. कल्याण पश्चिमेतील मौजे चिकणघर येथील म्हाडाच्या शांतीदूत गृहनिर्माण हौसिंग सोसायटी व रवीउदय को ऑप. सोसायटी, तर्फे २०११ मध्ये पुनर्विकास प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी टायकून अवंतीच्या श्रीकांत शितोळे आणि चेतन सराफ या दोघा बांधकाम विकासकांनी जबाबदारी स्वीकारली होती. तसेंच एल.आय.जी १ कोकण वसाहत, विकासक मे पटेल ग्रुप चे श्री हसमुख पटेल यांनी तब्बल १४ वर्षांहून अधिक काळ उलटूनही त्यांच्याकडून हा प्रकल्प पूर्ण करणे तर दूरच पण लेखी करारानुसार झालेल्या गोष्टींचीही पूर्तता करण्यात आली नसल्याने या शेकडो रहिवाशांवर देशोधडीला लागण्याची वेळ प्राप्त झाल्याचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी या बैठकीत सांगितले. तसेच यातील काही रहिवाशांचा मृत्यू झाला असून काही जण आजाराशीही झुंजत आहेत. या पार्श्वभूमीवर संबंधित दोघाही विकासकांवर कायदेशीर कारवाई करून म्हाडाने तो ताब्यात घेऊन नियमाप्रमाणे पूर्ण करून देण्याची भूमिकाही पवार यांनी यावेळी मांडली. तसेच कार्यकारणी बरखास्तीचा उपनिबंधकांचा आदेश रद्द करणे, विकासक आणि माजी कार्यकारणी यांनी संस्थेच्या पुनर्विकास प्रकल्पात केलेल्या गैरकारभाराबाबत संबंधितावर फौजदारी गुन्हा दाखल करणे, संस्थेने विकासकाशी केलेला करार संस्थेच्या ०६/०४/२५ रोजी रद्द केला असून म्हाडाने विकासकाला दिलेली एनओसी रद्द करावी, सभासदांचे थकीत घरभाडे- इतर देणी मिळवीत आणि या विकासकाने HDFC बँकेकडून घेतलेल्या तब्बल 325 कोटी रुपयांच्या कर्जाची चौकशी करण्याची आग्रही मागणीही माजी आमदार नरेंद्र पवार यांनी या बैठकीत केली. त्यावर गृहनिर्माण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी ही सर्व वस्तुस्थिती जाणून घेत इतक्या लोकांच्या जीवाशी खेळण्याचा हा अतिशय गंभीर विषय असल्याचे यावेळी नमूद केले. तसेच हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्य शासन स्तरावर जी काही कार्यवाही करणे आवश्यक आहे ती करण्याचे आश्वासनही त्यांनी उपस्थित रहिवाशांना दिले. तर रहिवाशांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांवरही कायदेशीर कार्यवाही करण्याचे निर्देश देऊन यासंदर्भात लवकरच संबंधित अधिकाऱ्यांसमवेत पुढील बैठक घेण्यात येईल असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. त्याशिवाय या सोसायटीतील काही ज्येष्ठ नागरिकांनी याप्रकरणी न्याय मिळण्यासाठी प्रशासनाकडे वारंवार पत्रव्यवहार केला होता. मात्र त्याचीही कोणतीही दखल घेतली गेली नसल्याचे गृहनिर्माण राज्यमंत्र्यांच्या निदर्शनास येताच ज्येष्ठ नागरिक कायद्यांतर्गत त्याबाबत पुढील कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांच्याकडून यावेळी देण्यात आल्या.

---

## बंद केलेल्या शटल सेवा पूर्ववत करा

### मुंब्रा दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर उपनगरी रेल्वे प्रवासी संघाची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनसकडून कसारा, कर्जत, खोपोलीकडे जाणाऱ्या लोकलवरील प्रवासी भार कमी व्हावा याकरिता रेल्वे प्रशासनाकडून ठाणे रेल्वे स्थानकातून कर्जत, कसारा, बदलापूर, अंबरनाथ दिशेने यापूर्वी सुमारे ३२ शटल सेवा सुरू केल्या होत्या. यामधील बहुतांशी सेवा बंद करण्यात आल्या आहेत. बंद करण्यात आलेल्या शटल सेवा पूर्ववत करण्यात याव्या, अशी मागणी उपनगरी रेल्वे प्रवासी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सोमवारी मध्य रेल्वेचे अतिरिक्त



महाव्यवस्थापक प्रतिक गोस्वामी यांच्याकडे केली.

ठाण्याहून कर्जत, कसारा दिशेने सोडण्यात येणाऱ्या शटल सेवेमुळे याभागात जाणाऱ्या प्रवाशांना मुंबईहून येणाऱ्या लोकलची प्रतीक्षा करावी लागत नव्हती. मुंबईकडून कसारा, कर्जतकडे जाणाऱ्या लोकल घाटकोपर, ठाणे स्थानकापर्यंत प्रवाशांनी खचाखच भरलेल्या असतात. या गर्दीने भरलेल्या लोकलमध्ये ठाणे स्थानकात प्रवाशांना चढता येत नाही. अशावेळी प्रवासी ठाणे रेल्वे स्थानकातून सुटणाऱ्या शटल सेवेवर अवलंबून राहत होते.

मागील काही महिन्यांपासून या शटल सेवेच्या फेऱ्या ३२ वरून १६ वर आणण्यात आल्या आहेत. निम्म्याहून अधिक फेऱ्या कमी केल्याने सहाजिकच प्रवासी मुंबईहून येणाऱ्या लोकलवर अवलंबून राहावे लागते. या लोकलमध्ये आटापिटा करून गर्दीतून ते प्रवास करतात, असे उपनगरी रेल्वे प्रवासी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी रेल्वे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणले. या शिष्टमंडळात उपनगरीय रेल्वे प्रवासी महासंघाच्या अध्यक्षा लता अरगडे, नंदकुमार देशमुख आणि इतर पदाधिकाऱ्यांचा सहभाग होता.

---

## अपुऱ्या चार्जिंग स्टेशनअभावी नवीमुंबई परिवहन सेवेचा बोजवारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वाशी ता. १०: पर्यावरणपूरक वाहतुकीसाठी एनएमएमटीच्या वतीने इलेक्ट्रिक गाड्यांना प्राध्यान्य दिले जात आहे. त्यानुसार इलेक्ट्रिक बस खरेदी करण्याकडे नवी मुंबई महापालिका प्रशासनाचा कल आहे. या बससाठी शहरात २१ ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता, मात्र तो धूळखात पडून आहे. त्यामुळे होत आहे. त्यातच चार्जिंगसाठी बराच वेळ लागत असल्याने अन्य गाड्यांतून प्रवाशांना पुढील प्रवास पूर्ण करावा लागत आहे. सध्या एनएमएमटीच्या ताफ्यात ५० टक्के इलेक्ट्रिक बसेस आहेत, मात्र चार्जिंग स्टेशन फक्त चारच ठिकाणी आहेत. घणसोली, तुर्भे आगाराबरोबर वाशी रेल्वे आणि नेरूळ येथील बसस्थानकात चार्जिंगसाठी स्टेशन उभारण्यात आलेली आहेत. जवळच्या मार्गावर या बसेस चालवताना चार्जिंग संपण्याअगोदर त्या आगारात पाठविल्या जातात, मात्र लांब पल्ल्याच्या मार्गावरील बस गाड्यांमध्ये कुठेच चार्जिंग करता येत नसल्याने मोठी अडचण येते. त्यामुळे जवळील अंतरावरील गाड्यांना जेमतेम ६० ते ७० टक्केच चार्जिंग केली जाते, तर लांब पल्ल्याच्या गाड्यांना फुल्ल चार्जिंग करण्यात येते. बस चार्जिंगसाठी शहरात २१ ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारली जाणार होती, मात्र हे चार्जिंग स्टेशन उभारण्याचा प्रस्ताव तीन वर्षांपासून धूळखात पडून आहे. त्यामुळे चार्जिंग स्टेशनची उभारणी होऊ शकलेली नाही. आतापर्यंत शहरात केवळ चार चार्जिंग स्टेशन उपलब्ध आहेत. अपुऱ्या चार्जिंग स्टेशन अभावी गाड्यांना चार्जिंग करण्यात अडचण येत आहे. त्यामुळे लांब पल्ल्याच्या गाड्या चार्जिंगअभावी अर्ध्या प्रवासात बंद पडत आहेत.

---

तहसीलदारांच्या स्वखर्चातून

## कोतवाल शिपायांना ऐतिहासिक किल्ल्यांचे दर्शन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** माणूसकिची जाण असलेले तहसिलदार अभिजित देशमुख यांनी मुरबाड तालुक्यातील विविध ठिकाणी महसूलमंडळात काम करणाऱ्या दहा कोतवालांना महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्ले तिर्थ क्षेत्रांचे दर्शन घडविण्याठी स्वखर्चातून सहा दिवसाच्या प्रवासाचे नियोजन केले आहे. त्यामुळे परिमंडळातील रोहित चौधरी, दिपक घनघाव, सुरेश घोलप, किसन उघडे, नारायण गायकवाड, प्रमोद साळवी, शरद शिंदे, तातु ठाकरे (रिटायर्ड शिपाई) रोहित उबाळे,रोहित शिंदे या दहा शिपाई कोतवालांना ऐतिहासिक रायगड किल्ला, शिवनेरी, प्रतापगड, पन्हाळा, महालक्ष्मी कोल्हापुर, भिंमाशंकर,पुण्याचा लालमहल, कसबागणपती, अशा ऐतिहासिक ठिकाणची सहा दिवसाची सहल अनुभवता येणार आहे.









## गीतासार



### अध्याय १३
### क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगः

ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते । ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य विष्ठितम् ॥ १३-१७ ॥

ते परब्रह्म ज्योतींची ज्योत आणि मायेच्या अत्यंत पलीकडे म्हटले जाते. तो परमात्मा ज्ञानस्वरूप, जाणण्यास योग्य आणि तत्त्वज्ञानाने प्राप्त होण्याजोगा आहे. तसेच सर्वांच्या हृदयात विशेषरूपाने राहिलेला आहे.
॥ १३-१७ ॥

इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः । मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते ॥ १३-१८ ॥

अशाप्रकारे क्षेत्र तसेच ज्ञान आणि जाणण्याजोगे परमात्म्याचे स्वरूप थोडक्यात सांगितले. माझा भक्त हे तत्त्वतः जाणून माझ्या स्वरूपाला प्राप्त होतो.
॥ १३-१८ ॥

प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि । विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसम्भवान्
॥ १३-१९ ॥

प्रकृती आणि पुरुष हे दोन्हीही अनादी आहेत, असे तू समज आणि राग-द्वेषादी विकार तसेच त्रिगुणात्मक सर्व पदार्थही प्रकृतीपासूनच उत्पन्न झालेले आहेत, असे समज. ॥ १३-१९ ॥

कार्यकरणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते । पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते
॥ १३-२० ॥

कार्य व करण यांच्या उत्पत्तीचे कारण प्रकृती म्हटली जाते आणि जीवात्मा सुखदुःखांच्या भोगण्याला कारण म्हटला जातो.
॥ १३-२० ॥

## आरोग्य
### आरोग्यदायी कोथिंबीरचा रस

कोथिंबीर मध्ये असलेले डिटॉक्सिफायिंग गुणधर्म शरीरातील विषारी घटक काढून टाकण्यास मदत करतात. तसेच, त्यात असलेले अँटीऑक्सिडंट्स, व्हिटॅमिन सी, पोटॅशियम आणि फायबर मूत्रपिंड आणि मूत्रमार्ग मजबूत करतात. चला त्याचे फायदे आणि त्याचे सेवन करण्याची योग्य पद्धत जाणून घेऊया.

कोथिंबीरचा रस मूत्रपिंडाच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे कारण त्यात अँटीऑक्सिडंट आणि दाहक-विरोधी गुणधर्म असतात, जे मूत्रपिंडातील दगड आणि इतर समस्या टाळतात. तसेच, हा रस शरीरातील हानिकारक विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करतो, ज्यामुळे मूत्रपिंडांवरील दबाव कमी होतो आणि त्यांना चांगले कार्य करण्यास मदत होते.
पचनसंस्था: कोथिंबीरचा रस पचनसंस्था सुधारण्यास मदत करतो, ज्यामुळे शरीराला पोषक तत्वे शोषण्यास मदत होते.
**रोगप्रतिकारक शक्ती वाढवते**: हिरव्या धण्यांचा रस केवळ मूत्रपिंडाचे आरोग्य सुधारत नाही तर रोगप्रतिकारक शक्ती देखील मजबूत करतो. त्यात असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वे रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात आणि मूत्रपिंडाच्या संसर्गाचा धोका कमी करतात.
**यूटीआयमध्ये आराम मिळतो:** कोथिंबीरच्या रसामध्ये आढळणारे अँटीबॅक्टेरियल गुणधर्म यूटीआय (मूत्रमार्गाचा संसर्ग) रोखतात आणि मूत्रपिंड निरोगी ठेवण्यास मदत करतात. नियमित सेवनाने यूटीआय आणि मूत्रपिंडाच्या संसर्गाची शक्यता कमी होते.

## मुंबई क्षेत्रातील अतिरिक्त शिक्षक
# ठाणे पालघर जिल्ह्यात नकोत



**ठाणे पालघर जिल्ह्यातील अतिरिक्त शिक्षक जाणार कुठे ? - गुलाबराव पाटील**

### महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेची शिक्षण मंत्र्यांशी भेट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद कोकण विभाग अध्यक्ष गुलाबराव पाटील व उपाध्यक्ष हेमलता मुनोत यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची भेट घेत मुंबईतील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन ठाणे पालघर जिल्ह्यात करू नका, ठाणे पालघर जिल्ह्यातील अतिरिक्त शिक्षक जाणार कुठे असा सवाल करत अतिरिक्त शिक्षकांच्या समस्यांवर चर्चा केली.

मराठी माध्यमासह इतर माध्यमाच्या अनुदानित शाळा शासनाने नवीन संच मान्यतेचे धोरण ठरविल्यामुळे विद्यार्थी संख्या कमी होत असल्याने अनेक शिक्षक अतिरिक्त ठरले आहेत. 15 मार्च 2024 च्या शासन निर्णयामुळे तर अनेक शाळा बंद पडून हजारो शिक्षक अतिरिक्त ठरत आहेत शासनाकडे पूर्वीप्रमाणे वर्गनिहाय शिक्षक किंवा 15 ते 20 पटसंख्या असलेला सुधारित शासन निर्णय काढा. असे संघटनात्मक शासन दरबारी निवेदने दिली आंदोलन केली. तरीही 15 मार्च 2024 चा शासन निर्णय रद्द करून नवीन आदेश काढला नाही. प्रत्येक जिल्ह्यात अतिरिक्त शिक्षकांचे प्रमाण अधिक आहे ठाणे पालघर जिल्ह्यात अतिरिक्त शिक्षक असतांनाच मुंबईतील अतिरिक्त शिक्षक पाठवू नये. 2024/25 घ्या संच मान्यतेनुसार ठाणे जिल्ह्यात अतिरिक्त शिक्षक आहेत. शासन आदेशान्वये प्रथम आपापल्या मूळ जिल्ह्यात अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन होणे आवश्यक आहे.

तदनंतर इतर जिल्ह्यातील शिक्षकांचे समायोजन करणे हे धोरण आहे परंतु या धोरणचे पालन न करता शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून ठाणे जिल्ह्यात अतिरिक्त शिक्षक असताना देखील इतर शिक्षकांना समायोजनाचे आदेश दिले जात आहेत. हि बाब योग्य नसल्याने तसेच ठाणे जिल्ह्यातील अनेक संस्थांनी मुंबईचे शिक्षक नाकारले आहेत. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद कोकण विभागाचे अध्यक्ष गुलाबराव पाटील व उपाध्यक्ष हेमलता मुनोत यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना निवेदन देऊन हि बाब लक्षात आणून दिली मंत्री भूसे यांनी निवेदनाची दखल घेत तातडीने पूर्तता करण्याचे आश्वासन दिले.

# मानद डॉक्टरेट पदवी प्रदान समारंभ संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : स्वर्गीय एम.जे. पंडित चॅरिटेबल ट्रस्ट आणि दिलासा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. कल्याणमधील जोशीबाग येथील यशोदा हॉलमध्ये, बंगळुरू येथील प्रसिद्ध उद्योगपती नंदकुमार चंद्रनाथराव कागवते यांना त्यांच्या सामाजिक-शैक्षणिक कार्यासाठी "सॉक्रेटीस सोशल युनिव्हर्सिटी ऑनराइस CAUSA" कडून मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली.
या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कल्याणचे सुप्रसिद्ध समाजसेवक डॉ. विजय पंडित (अध्यक्षः अग्रवाल कॉलेज) यांनी केले.
या कार्यक्रमात, प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ, "दिलासा फाउंडेशन" चे अध्यक्ष डॉ. पद्मिनी कृष्णा आणि प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ, "महामदिया स्कूल" चे अध्यक्ष डॉ. साद काझी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.
या प्रसंगी समाजातील शेकडो सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.
या कार्यक्रमात, कॉर्पोरेट प्रशिक्षक डॉ. शशिधरन, टीव्ही मालिका कलाकार, कवी डॉ. दीपक खांडेकर यांनी उपस्थितांना संबोधित केले.
कार्यक्रमाचे अध्यक्ष विजय पंडित यांनी समाजातील वाढती हिंसाचार आणि अंमली पदार्थांचे व्यसन टाळण्याचा सल्ला दिला आणि समाजाची एकता मजबूत करण्यावर भर दिला.
डॉ. पद्मिनी कृष्णा यांनी दिलासा फाउंडेशनच्या सामाजिक उपक्रमांवर प्रकाश टाकला.
डॉ. साद काझी यांनी परस्पर वैर विसरून एकजूट राहण्याचे आवाहन केले. डॉ. नंदकुमार यांनी सर्व आयोजकांचे आभार मानले आणि सर्वांना बंगळुरूला येण्याचे आमंत्रण दिले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. मनीष मिश्रा यांनी केले तर नरेंद्र पंडित यांनी उपस्थितांचे आभार मानले.
कार्यक्रमाची सांगता चविष्ट जेवणाने झाली.

# दृष्टिहीन राज्यस्तरीय पावरलिफ्टिंग निवड चाचणी स्पर्धा संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : दृष्टिहीन राज्यस्तरीय पावरलिफ्टिंग निवड चाचणी स्पर्धा आठ जून रोजी नॅशनल कॉलेज बांद्रा पश्चिम येथे प्यारा ब्लाइंड असोसिएशन महाराष्ट्र व महाराष्ट्र स्टेट पॉवरलिफ्टिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत महाराष्ट्रातील दृष्टिहीन पॉवरलिफ्टर्सने मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवून ही स्पर्धा आपल्या सर्वांग सुंदर खेळाने व खिलाडवृत्तीने यशस्वीरित्या पार पडली. या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील दृष्टीहीन महिला व पुरुष खेळाडूंनी आपल्या सहभागांनी ही स्पर्धा गाजवली. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ स्टेट पॉवरलिफ्टिंग महाराष्ट्राचे सेक्रेटरी संजय सरदेसाई व ब्लाइंड असोसिएशन महाराष्ट्राचे सेक्रेटरी पंकज चौधरी, अध्यक्ष नेहा पावसकर, खजिनदार मनोज कटारिया व युनिव्हर्सिटीचे कोच सुरेश चेडे यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. या स्पर्धेत दिव्यांग क्रीडा क्षेत्रातील जाणकार रवींद्र सकपाळ त्यांनी या स्पर्धेत 125 किलो वजनी गटात व अंशतः दृष्टीहीन p 12 या गटातून राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग नोंदवून आपल्या सर्वोत्तम खेळाने सुवर्णपदक प्राप्त केले. ते स्वतः नवी मुंबई महानगरपालिकेत कबड्डी मार्गदर्शक म्हणून सुदृढ व दिव्यांग खेळाडू घडवत असून क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव व अधीक्षक काशिनाथ गोलवड यांचे मार्गदर्शन व विजय शेलार यांच्या सहकार्याने दिव्यांगांच्या क्रीडा क्षेत्रात उत्तम कामगिरी करत आहेत.

# ब्रह्मांड संगीत कट्टयाच्या पाचव्या शाखेचे उदघाटन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : गेली अठरा वर्षं सामाजिक संस्कृतिक क्षेत्रात काम करणारी ब्रह्मांड कट्टा संस्था त्याच्या अंतर्गत विविध उपसंस्था कार्यरत आहेत. त्याचाच एक भाग ब्रह्मांड संगीत कट्टा गेली आठ वर्षं संगीत क्षेत्रात कार्यरत आहे. त्याच्या विविध चार शाखा घोडबंदर रोड ब्रह्मांड येथे दोन तर ठाणे शहर शाखा व वसंत विहार शाखा सध्या संगीत क्षेत्रात त्या त्या परिसरात कार्यरत आहेत. ब्रह्मांड संगीत कट्टयाचे प्रथम अध्यक्ष कै. अरुण दळवी काका यांच्या जयंतीचे औचित्य साधून कोलशेत-ढोकाळी ह्या पाचव्या शाखेचा शुभारंभ रविवार दिनांक ८ जून २०२५ रोजी कल्पतरू पार्क जवळ, लिटिल मिलेनियम स्कूल येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर शाखेचे उदघाटन स्थानिक मा. नगरसेवक संजय भोईर व ब्रह्मांड कट्टा परिवाराचे संस्थापक राजेश जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.
ढोकाळी कोलशेत परिसरातील संगीत प्रेमींना एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध झाल्याचे प्रतिपादन प्रमुख पाहुणे संजय भोईर यांनी केले व कट्टयाला सर्वतो परीची मदत सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. तसेच संस्थापक राजेश जाधव यांनी ब्रह्मांड संगीत कट्टयाच्या नजीकच्या काळात अजून दोन शाखा कळवा खारेगाव व कोपरी येथे शाखा उघडण्याचा मानस असल्याचे सांगितले. कोलशेत ढोकाळी शाखेचे अध्यक्ष पद स्थानिक रहिवाशी अतुल पवळे, सचिव मोहन अय्यर, खजिनदार लता अय्यर, उपाध्यक्ष किशोर ठक्कर, सहसचिव डॉ.गिरीशा सेवक तर तांत्रिक प्रसिद्धी प्रमुख म्हणून सुरेंद्र मोहन यांची निवड करण्यात आली .

शुभारंभाच्या कार्यक्रमास कै. दळवी काका यांच्या पत्नी शोभा दळवी, मुली अपूर्वा व अंकिता, बहीण सीमा सावंत, ब्रह्मांड कट्टयाचे अध्यक्ष महेश जोशी कलासंस्कार अध्यक्षा वर्षा गंद्रे तसेच सर्व ब्रह्मांड संगीत कट्टा शाखेचे पदाधिकारी शीतल बोपालकर, सावन कुमार सुपे, ऋजुता देशपांडे, मनीषा ठाणेकर, कविता सपकाळे, नीलम भोगटे, मीरा वेलिंग, हेमंत मयेकर, सचिन काकडे, आनंद खर्डीकर, प्रल्हाद माघाडे आणि समस्त संगीत प्रेमी शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते. या प्रसंगी विभागातील कलाकारांनी सोलो डुएट अशी एकूण तीस गाणी सादर केली व रसिकांनी मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे निवेदन अध्यक्ष अतुल पवळे यांनी केले तर सचिव मोहन अय्यर यांनी आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता केली.

# खारेपाट विभागाला सिंचन सुविधा उपलब्ध होणार – सी.आर.म्हात्रे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : खारेपाट विकास संकल्प ग्रुपने सिंचनाच्या पाण्यासाठी दोन आमरण उपोषण केले,ते फलद्रूप झाले,कधी नव्हते एवढा लोक प्रतिसाद मिळाला,यातून मंत्री महोदय यांनी उपोषणाची दखल घेतली.बऱ्याच नेत्यांनी,प्रश्नाचा पाठपुरावावा केला.

खासदार सुनीलजी तटकरे यांनी आपल्या चतुरस्त्र नेतृत्वाने ७६६ कोटीचा निधी मंजुरीचे पत्र मिडिया पुढे वाचून दाखविले,तसे पत्र खारेपाट विभागात कार्यकर्त्यांनी आणून दिले.एक गोड सांगता झाली.असे वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी.आर.म्हात्रे यांनी सांगितले


पण एक वर्ष उलटला तरी कार्यारंभ होत नाही.अपडेट वेगवेगळी येते. असो आले देवाजीच्या मना येथे कोणाचे चालेना. वाट पाहण्यात मजा असते. लहरी पाऊस,कधीही येतो आगंतुक .यावेळी तर बरोबर एक महिना अगोदर.७ मे रोजी बरसला तो कायमच मुक्कामी राहिला. पावसातील लग्न पार पडली.मात्र अन्नदात्याची पेरणी करायची राहून गेली.साधारणपणे २४ मे नंतर शेतकरी राजा पेरणीला सुरुवात करतो.पण या पावसाने पुरी वाट लावली.पेरणीचे वेळापत्रक बिघडून टाकले,बियाणे,खते,खरेदीला वेळच मिळाला नाही.बाजारात पण ही आवक दिसलीच नाही.याचा अर्थ जून ते सप्टेंबर हे पावसाचे महिने कागदावच दिसतात. आत्ता हवामानाचे अंदाज दर्शविणारे १९७२ च्या दुष्काळाची आठवण करून देतात.म्हणजे धडकी भरविणारे दिवस आठवतात. खाऊन दिवस काढले ती पुनरावृत्ती नको.
महत्वाचा मुद्दा हा की या लहरी पावसामुळे हातात आलेली पिके पण जातात.शेतक-याचा पूर्वीचा अचूक अंदाज यावेळी चुकला.जमिनीची ऊब गेली,मशागत केलेले राब सपाट झाले,पेरणी करणार कधी,रोपे तयार कधी करणार, पण भात रुजणार कधी, पुर्ण हंगाम गेला.एकंदरीत वेळीच भात पीक लावणी झाली नाही तर पावसाळ्यात पीक मिळणार नाही,दरवर्षी ही संकटे येतात,त्यावर आमचा अन्नदाता मात करतोच.आणि नव्या उमेदीने जगतो.वडिलोपार्जित शेती पिकवतो आणि जगतो.
सिंचनासाठी हेटवणे धरणाची निर्मिती झाली. पाणी शहराला दिला पण खारेपाटाची शेती कधी बहरली नाही, मात्र खारेपाट विभागातील उपोषण कर्ते यांनी सरकारदरबारी आवाज उठवून विभागातील शेती सुजलाम सुफलाम करण्याचे स्वप्न पाहिले आणि ते पूर्णत्वास नेण्यासाठीचा प्रयत्न केला .त्यासाठी उन्हाळी पिकासाठी सिंचनाचे पाणी वरदान ठरेल हे दाखविण्यासाठी आमच्या शेतकरी बंधूंनी फळ भाज्या, बटाटा,फुल पिके घेऊन सरकार दरबारी पुरावा सादर केला.याचा अर्थ पावसाळी पिक भरवशाचा नाही त्यावर उपाय म्हणून उन्हाळी विविध पिके घेऊन शेतकरी सुखी होईल यात तिळमात्र शंका नाही.उन्हाळी पिक हे नक्कीच वरदान ठरेल,शेतकऱ्याच्या हाताला पैसा मिळेल,मासे शेती पण बहरेल,हिरवीगार उन्हाळयातील शेती पाहण्याचे स्वप्न आज आमच्या १९५० नंतरच्यापिढीला पाहता येईल,यासाठी बऱ्याच समवयस्क पिढीने सुद्धा उपोषणाला मदत केली,विविध आंदोलने केली,पाहूया लाडक्या सरकारचे काम पावसाळा संपताच कार्यारंभाची सुरुवात होईल की नाही ती.सात आमदार, दोन खासदार ,यांनी जर मनावर घेतले तर आमच्या खारेपाट विभागाला सिंचनाचे पाणी मिळून तहान भागेल,आमच्या लाडक्या बहीणी खुश होऊन डोईवरील हंडा उतरुन दुवा देतील.लाडके मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब आमच्या हाकेला हो म्हणतील अशी आशा करू या.असेही सी.आर.म्हात्रे यांनी सांगितले.

## कृषी विभागामार्फत
# डि.ए.पी.खतास पर्यायी खत वापरण्याचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : खरिप हंगाम सुरू झाला असून शेतक-यांकडून पिकांसाठी डि.ए.पी खताची मागणी मोठ्या प्रमाणत होत आहे. डि.ए.पी. खतात 18 टक्के नत्र व 46 टक्के स्फुरद ही मुलद्रव्ये आहेत. शेतक-यांना हंगामात डि.ए.पी. खताची कमतरता भासल्यास पर्यायी खते मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. शेतकरी खालील पर्यायांचा वापर करू शकतात.
**एक गोणी डि.ए.पी. खतास खालील प्रमाणे पर्याय :-**
1) 1/2 गोणी युरिया +3 गोण्या एस.एस.पी. वापरल्यास एस. एस. पी. खतामधून गंधक मुलद्रव्य मिळते.
2) 1/2 गोणी युरिया +1 गोणी टी. एस.पी. वापरल्यास. टी एस.पी. खतामधून गंधक मूलद्रव्य मिळते. 3) 37 कि. ग्रॅ. 24-24-0 + 87 कि.ग्रॅ. एस. एस. पी.. 4) 45 किग्रॅ 20-20-0-13 + 87 कि.ग्रॅ. एस. एस.पी. वापरल्यास खतामधून गंधक मुलद्रव्य मिळते. 5) 71 कि. ग्रॅ. 12-32-16 वापरल्यास अतिरिक्त पोटॅश मुलद्रव्य मिळते. 6) 59 कि.मे 15-15-15+87 कि.ग्रॅ. एस.एस.पी. वापरल्यास अतिरिक्त पोटॅश व गंधक मुलद्रव्य मिळते. 7) 57 कि. मे 16-16-16+87 कि.ग्रॅ. एस.एस.पी. वापरल्यास अतिरिक्त पोर्टश व गंधक मुलद्रव्य मिळते. 8) 48 कि. मे 19-19-19+87 कि.ग्रॅ.एस. एस.पी. वापरल्यास अतिरिक्त पोटॅश व गंधक मुलद्रव्य मिळते. डि.ए.पी. खतास पर्याय म्हणून वरील पैकी पर्यायी खतांचा वापर करण्याबाबत कृषी विभागा मार्फत आवाहन करण्यात येत आहे, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, ठाणे रामेश्वर पाचे यांनी कळविले आहे.

## एमआयडीसीमधील
# रहिवासी इमारतींना केडीएमसीच्या नोटिसा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : डोंबिवली एमआयडीसी निवासी मधील रहिवासी इमारतींना गेल्या काही दिवसांपासून नोटिसा बजावण्याचे कल्याण डोंबिवली महापालिकेकडून होत असून या नोटिसा संरचनात्मक तपासणी (स्ट्रक्चरल ऑडिट) आणि त्यानंतर तपासणीत धोकादायक इमारत झाली असेल तर तातडीने दुरुस्ती करून घ्यावी. अशा नोटिसा अनेक इमारतींना, सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांना कल्याण डोंबिवली महापालिकेकडून एमआयडीसी निवासी इमारतींना मिळत असल्याने त्यात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे कसूर केल्यास महाराष्ट्र महापालिका अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल तसेच कोणतीही दुर्घटना घडल्यास आपणास जबाबदार धरण्यात येईल. त्यामुळे येथील रहिवाशी त्रस्त झाले असून आता यापुढे काय करायचे असा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहिला आहे.

एमआयडीसी निवासी मधील या रहिवाशी इमारतींना साधारण अंदाजे 30 ते 40 वर्षे इतकी झाली आहेत. त्यात येथे रासायनिक प्रदूषण असल्याने त्यातील लोखंडी सळ्या, सिमेंट कॉंक्रीट हे खराब झाले आहे. सहाजिकच त्या इमारती दुरुस्तीला किंवा रिडेव्हलपमेंटला आल्या आहेत. काही इमारतींनी सोसायट्यांनी दुरुस्ती करून घेतल्या आहेत तर काहींनी पैशाअभावी व इतर प्रलंबित प्रश्न अभावी अद्याप दुरुस्ती करून घेतल्या नाहीत. या सर्व इमारतींचे भूखंड हे एमआयडीसीने 95 वर्षांच्या भाडेपट्ट्याने दिले आहेत. शिवाय यात एमआयडीसी कडून अनेक अटी, शर्ती टाकण्यात आल्या असल्याने रिडेव्हलपमेंट करण्यास मोठी अडचण निर्माण झाल्या आहेत.

डोंबिवली एमआयडीसी मध्ये नियोजन प्राधिकरण हे एमआयडीसी कडे असल्याने इमारतींची बांधकाम आणि बांधकाम पूर्णतेचा व भोगवटा प्रमाणपत्र हे देण्याचा अधिकार हा एमआयडीसीकडे आहे. त्यामुळे या नोटिसा खरे तर एमआयडीसी कडून दिल्या गेल्या पाहिजे होत्या. कल्याण डोंबिवली महापालिकेकडून एमआयडीसी निवासी मधील इमारती मधील रहिवाशांना अशा नोटिसा देवून घाबरवण्याचा प्रयत्न चालू केला असून जर या पावसाळ्याच्या तोंडावर हे नोटीस सत्र थांबले नाही तर येथील जनता ही रस्त्यावर उतरून सर्वपक्षीय आंदोलन करण्यात येणार असल्याचे ठरविण्यात येत आहे.



## आजचे राशिभविष्य

**मेष**
आर्थिक बाबी स्पष्ट करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे लागेल. नवीन मालमत्ता खरेदी करण्यासाठी तुम्हाला धावपळ करावी लागेल.

**वृषभ**
व्यवसायात नवीन भागीदार फायदेशीर ठरतील. जमा बांडवलात वाढ होईल.घरमालक तुम्हाला ते रिकामे करण्यास सांगू शकतो.

**मिथुन**
तुमच्या स्वतःच्या घरात राहत असाल तर तुम्ही जुने घर रिकामे करून नवीन घरात जाऊ शकता. घाईघाईत पैसे गुंतवू नका.

**कर्क**
मालमत्तेशी संबंधित खरेदी-विक्रीसाठी तुम्हाला धावपळ करावी लागेल. महत्वाचं काम पूर्ण होण्याची शक्यता आहे.

**सिंह**
दिवस तुमच्यासाठी आनंददायी, फायदेशीर आणि प्रगतीशील असेल. कोणतेही महत्त्वाचे काम पूर्ण होईपर्यंत ते उघड करू नका.

**कन्या**
तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या.तुमचे आरोग्य चांगले राहील. आरोग्याशी संबंधित कोणत्याही समस्या येण्याची शक्यता कमी असेल.

**तूळ**
बाहेर प्रवास करताना खाण्यापिण्याच्या बाबतीत संयम बाळगा.तुम्हाला आरोग्याच्या किरकोळ समस्या सतावतील. तुमची दिनचर्या शिस्तबद्ध ठेवा.

**वृश्चिक**
तुमच्या खाण्यापिण्याच्या सवयींवर नियंत्रण ठेवा. कामाच्या ठिकाणी जास्त मेहनत करावी लागेल. सहकाऱ्यांशी समन्वय साधण्याची गरज भासेल.

**धनु**
कामाच्या ठिकाणी येणारे अडथळे कमी होतील. उत्पन्नाचे स्रोत वाढतील.तुमचा नोकरीचा शोध पूर्ण होईल. चांगलं काम मिळेल.

**मकर**
महत्त्वाच्या कामात येणारे अडथळे दूर होतील. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या लोकांना बाहेरच्या देशात जावे लागू शकते.

**कुंभ**
कुटुंबात अनावश्यक तणाव निर्माण होऊ शकतो. तुम्ही तुमचा राग आणि कठोर शब्दांवर नियंत्रण ठेवावे. अन्यथा भांडणे गंभीर वळण घेऊ शकतात.

**मीन**
तुम्हाला नोकरीच्या संधी मिळतील.व्यवसायात चांगले उत्पन्न असल्याने आर्थिक स्थिती मजबूत असेल.यामुळे भविष्यात आर्थिक लाभ होतील.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली,कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५-२६)
बारावीनंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
-बीएएमएमसी-
(बॅचलर ऑफ मल्टीमीडिया अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून बारावी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in
MASS MEDIA

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
Admission Open 2025-2026
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558






# उल्हासनगर महापालिकेची 'डिजिटल युगात हरित पावले'

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर महापालिकेची स्वच्छ, सुंदर आणि शाश्वत शहरासाठी 'हरित क्रांती' सुरू
उल्हासनगर, ता. ९ (वार्ताहर): हवामान बदलाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना, प्रशासनिक यंत्रणाही आता पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घेत आहेत. उल्हासनगर महापालिकेच्या आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी 'कार्बन फुटप्रिंट' कमी करण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्प केला आहे. यासाठी पर्यावरणपूरक आणि शाश्वत कार्यालयीन संस्कृतीकडे वाटचाल सुरू केली आहे. 'हरित कार्यालय' या दृष्टिकोनातून एक योजनेसदृश कृती आराखडा राबविला जात असून, त्याद्वारे प्रशासकीय कामकाजात नवसंवेदनशीलता आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. कोकण विभागीय आयुक्त कार्यालयाने १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेअंतर्गत कार्बन फुटप्रिंट कमी करण्याबाबतीत केलेल्या कार्याची शासनामार्फत विशेष दखल घेतली गेली. उल्हासनगर महापालिकेने विविध क्षेत्रांमध्ये ठोस बदल करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

सिंगल युज प्लॅस्टिक पूर्णतः बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कार्यालयीन परिसरात प्लॅस्टिक पाण्याच्या बाटल्या, कप, पिशव्या, बुके यांच्यावर बंदी लागू करण्यात आली आहे. स्टील किंवा काचेच्या वस्तूंचा पर्यायी वापर बंधनकारक करण्यात आला आहे. डिजिटल व्यवहार व कागदाचा वापर मर्यादित करण्यात आला आहे.



# रेल्वेच्या नियोजनशून्य कारभाराचा अंबरनाथ बदलापूरकरांना सर्वाधिक फटका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** अंबरनाथ, बदलापूर शहरांतून सर्वाधिक नोकरदार रेल्वेने प्रवास करत असून, दिवसेंदिवस या प्रवासीसंख्येत वाढ होत आहे. मात्र, गर्दीच्या वेळी रेल्वेच्या अपुऱ्या फेऱ्यांमुळे प्रवाशांना गर्दीने खच्चून भरलेल्या लोकलमधून प्रवास करावा लागत आहे. दररोज होणारे लहानमोठे अपघात आणि सततच्या मागणीनंतरही वाढीव रेल्वे फेऱ्या आणि मूलभूत सुविधांबाबत रेल्वे प्रशासन अंबरनाथ, बदलापूरकरांना गृहीत धरत असल्याची खंत प्रवासी आणि संघटनांनी सोमवारी व्यक्त केली.

मध्य रेल्वेच्या नियोजनशून्य आणि ढिसाळ कारभाराचा फटका अनेकदा प्रवाशांना सहन करावा लागतो. गेल्या काही काळात अंबरनाथ, विशेषतः बदलापूरकरांच्या समस्यांमध्ये भर पडली आहे. प्रवासी आणि रेल्वे प्रवासी संघटनांना विश्वासात न घेता करण्यात येणाऱ्या

**रेल्वेसंबंधी समस्या, गर्दीची स्थिती आणि नव्या लोकल गाड्यांबाबत आम्ही रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने मागणी करत आहोत. कल्याण-कसारा-कर्जत रेल्वे प्रवासी संघटनेच्या वतीने रेल्वेमंत्री, रेल्वे व्यवस्थापकांना यासंदर्भात निवेदने देण्यात आली आहेत. मात्र, याची दखल घेण्यात आलेली नाही, अशी माहिती कल्याण-कसारा-कर्जत रेल्वे प्रवासी संघटना अध्यक्ष, राजेश घनघाव यांनी दिली आहे.**

नियोजनामुळे फलाट आणि पादचारी पुलांवर प्रवाशांना सुटसुटीत मार्गाऐवजी चेंगराचेंगरीसदृश परिस्थितीतून प्रवास करावा लागत आहे.

अनेक भागांत शेडअभावी प्रवाशांना ऊन-पावसात उभे राहावे लागते. यातच मागील काही दिवसांपासून लोकल उशिराने धावण्याचे प्रकार वाढले आहेत. बदलापूर स्थानकाची क्षमता कमी असल्याने एखादी लोकल पाच मिनिटे जरी उशिराने आली तरी पुढच्या लोकलचे प्रवासी स्थानकात येतात. त्यामुळे अभूतपूर्व गर्दी होते. मात्र बदलापूर स्थानकावरून श्वास कोंडणारा प्रवास करणारे हजारो प्रवासी व प्रवासी संघटनांच्या मागण्यांकडे रेल्वे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप केला जात आहे. तसेच, भविष्यात मुंब्र्यासारखी एखादी घटना घडल्यावरच रेल्वे प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त प्रश्न उपस्थित केला जात आहे.

> **बदलापूर स्थानकावर वाढणाऱ्या गर्दीमुळे लोकलमध्ये चढताना प्रवासी रोजच जखमी होत आहेत. दोनच दिवसांपूर्वी सकाळी ६.५२ मिनिटांच्या लोकलमध्ये चढताना एक प्रवासी खांबाला धडकला. यात त्याचे नाक फुटून तो रक्तबंबाळ झाला. लोकलचा प्रवास दिवसेंदिवस अधिक असुरक्षित होत चालला आहे**
> **- एम. नरेकर, प्रवासी, बदलापूर**



# कर्जतच्या धबधब्यांचे पर्यटकांना आकर्षण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कर्जत, ता. १० (बातमीदार)** सह्याद्रीच्या कुशीत वसलेला कर्जत तालुका आपल्या निसर्गसंपन्नतेसाठी ओळखला जातो. डोंगररांगांमधून उगम पावणारे, झुलत्या धारेप्रमाणे खाली कोसळणारे धबधबे हे कर्जतच्या सौंदर्यात चारचाँद लावतात. विशेषतः पावसाळा सुरू झाला की हे धबधबे पर्यटकांना खुणावू लागतात. मुंबई आणि पुण्यासारख्या शहरांपासून केवळ काही तासांच्या अंतरावर असलेला हा परिसर, वर्षा पर्यटनासाठी उत्तम पर्याय म्हणून उदयास आला आहे, मात्र प्रशासनाकडून पर्यटनाचा आनंद घेताना प्रथम सुरक्षितता पाळण्याचे आवाहन करण्यात येत आहे, तर अनेक धोकादायक ठिकाणी उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

पूर्वी अनेक नैसर्गिक ठिकाणी पर्यटकांच्या मृत्यूमुळे प्रशासनाने काही ठिकाणी प्रवेशावर बंदी घातली होती. पाण्याचा अंदाज न येणे, निसरडी जमीन, खोल धबधबे यामुळे अनेकांना जीव गमवावा लागला, मात्र यंदा रायगड जिल्हा प्रशासन, पोलिस यंत्रणा आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या समन्वयातून सुरक्षिततेच्या उपाययोजना करून पुन्हा एकदा पर्यटकांसाठी प्रवेश खुला करण्यात आला आहे. त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात विशेषतः शनिवार-रविवारी आणि सार्वजनिक सुट्ट्यांना, कर्जतमध्ये वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात जाणवते. चार फाटा चौक, श्रीरामपूर परिसरात वाहनांची रांग लागत असते. तसेच अनेक रिसॉर्ट येथे असल्याने आधीपासूनच वाहतुकीवर ताण असतो. रेल्वेने प्रवास करणाऱ्या पर्यटकांनासुद्धा ट्रेनमध्ये जागा मिळवणे कठीण जाते.

# ठाणे-बोरिवली बोगद्याला जोडणारा रस्ता भूमिगत करा

## जितेंद्र आव्हाडांची आक्रमक भूमिका




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** विकासाला कधीच कुणी विरोध करीत नाही. पण, विकास करताना अमर्याद वृक्षतोड करून धुळीचे साम्राज्य निर्माण केले जात असेल अन् त्यातून नागरिकांना फुफ्फुसाचे आजार जडणार असतील तर करायचे काय? शांततेसाठी घर घेणाऱ्यांच्या नशिबी गाड्यांच्या आवाजाचा कोलाहल येणार असेल तर नागरिकांना मानसिक धक्का बसणारच ना, त्यामुळे ठाणे - बोरिवली बोगद्याला जोडणारा रस्ता घोडबंदर रोडपर्यंत भूमिगत करावा, अशी नागरिकांसह आपली मागणी आहे. त्यासाठी आपण मुख्यमंत्र्यांसह एमएमआरडीएशी झगडण्यास तयार आहोत, असे राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा विधिमंडळ गटनेते डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले.

राज्य सरकारचा अंत्यत बहुचर्चित प्रकल्प असलेल्या ठाणे-बोरिवली भुयारी मार्गाविरोधात नुकतेच मुल्लाबाग येथील रहिवाशांनी रस्त्यावर उतरत आंदोलन केले होते. ठाणे शहरातून बोरिवली १५ मिनिटांत गाठण्यासाठी एमएमआरडीएकडून संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून भुयारी मार्ग तयार केला जात आहे. परंतु भुयारी मार्ग तयार करण्यापूर्वी एमएमआरडीएने या भागातील अनेक वृक्ष तोडले आहेत. या मार्गाच्या कामामुळे धूळ, प्रदूषण, वाहतूक कोंडी वाढली असून त्याचबरोबर जुन्या वृक्षांवर कुऱ्हाड चालविण्यात आल्याचा आरोप रहिवाशांनी केला होता.

धूळ प्रदूषणामुळे नागरिक आजारी पडण्याचे प्रमाण वाढले असल्याचे रहिवाशांनी सांगितले. हा मार्ग मुल्लाबाग येथून रस्त्यावरून नेण्याऐवजी मुल्लाबाग येथून युनी अपेक्सपर्यंत भुयारी मार्ग नेण्यात यावा, अशी मागणी रहिवाशांनी केली होती. मात्र, त्यावर निर्णय न झाल्याने आपल्या लढ्याचे नेतृत्व डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी करावे, अशी विनंती करीत स्थानिक नागरिकांकडून कॉसमॉस लॉंज क्लब हाऊसमध्ये एका बैठकीचे आयोजन केले होते.

> **दररोज येथून पन्नास हजार गाड्या जाणार असतील तर वाढणारे प्रदुषण आणि श्वसनाचे विकार नागरिकांनी का सहन करायचे? मी रस्त्यावर उतरून लढणारा माणूस आहे. आता लोक रस्त्यावर उतरले आहेत. त्यामुळे निकाल पटकन लागणार आहे. तसे पाहता, हा छोटा प्रश्न आहे. पण, तो सोडविण्याची सरकारची मानसिकता हवीय. हा लढा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यापर्यंत नेणार आहे. हा रस्ता घोडबंदर रोडपर्यंत भूमिगत करावा, यासाठी मी आग्रह धरणार आहे."**

डॉ. जितेंद्र आव्हाड म्हणाले की, "मानपाडा भागात लगतचा मुल्लाबाग परिसर निसर्गाने नटलेला आहे. एकीकडे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे डोंगर आणि दुसरीकडे अनेक वर्ष जुन्या वृक्षांची हिरवळ यामुळे ठाण्याच्या इतर भागाच्या तुलनेत या भागात वातावरणमध्ये नेहमी गारवा असतो. येथील निसर्गसंपदा पाहून अनेकांनी या भागात गृहखरेदी केली. आता त्यांना मानसिक धक्का बसला आहे

# पेण उपजिल्हा रुग्णालयात कमालीची अस्वच्छता

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण, ता. १० (वार्ताहर) :** पेण उपजिल्हा रुग्णालयात मागील अनेक वर्षांपासून स्वच्छतेचा अभाव जाणवत आहे. परिसरातील अनेक ठिकाणी साफसफाई व्यवस्थित होत नसल्याने रुग्णांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे दररोज रुग्णालयाची स्वच्छता करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते हरीश बेकावडे यांनी केली आहे.

> **पेण उपजिल्हा रुग्णालयामध्ये दररोज साफसफाई केली जाते; मात्र काही ठिकाणी स्वच्छतेचा अभाव असेल, तर तीसुद्धा तत्काळ दूर केली जाईल. येथील स्वच्छतेचा ठेका जुना असून, न्यू ज्वाला सिक्युरिटी फोर्स यांच्याकडे आहे. त्यांच्या माध्यमातून येथे तीन कर्मचारी साफसफाई करत आहेत.**
> **-डॉ. संध्या राजपूत, वैद्यकीय अधिकारी, पेण उपजिल्हा रुग्णालय**

> **पेण उपजिल्हा रुग्णालयात अनेक गोरगरीब, सर्वसामान्य रुग्ण उपचार घेत असतात, मात्र येथे असंख्य समस्या जाणवत असून, गेल्या काही वर्षांपासून स्वच्छतेचा फार मोठा अभाव निर्माण झाला आहे. रुग्णालयातील तसेच आजूबाजूचा परिसर स्वच्छ नसल्याने याकरिता अनेकदा पत्रव्यवहार केला आहे, परंतु याकडे उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.**
> **- हरीश बेकावडे, सामाजिक कार्यकर्ते**

तालुक्याच्या डोंगराळ भागातून अनेक आदिवासी बांधव, नागरिक तसेच गोरगरीब समाजातील रुग्ण उपचाराकरिता येथील उपजिल्हा रुग्णालयात येत असतात, मात्र या ठिकाणी अनेक समस्या उद्भवत असल्याने रुग्णांना अधिक उपचाराकरिता खासगी दवाखाने अन्यथा अलिबाग, मुंबई या ठिकाणी जावे लागते. त्यातच उपजिल्हा रुग्णालयातील परिसर तसेच अंतर्गत भागात स्वच्छतेची फार मोठी उणीव भासत असून, अनेक ठिकाणी दुर्गंधी येत असते. रुग्णालयातील बाथरूमची अस्वच्छता, तुटलेल्या खिडक्या, खिडक्यांना जाळी नसल्याने डासांचा त्रास, अनेक वॉर्डमधील तुटलेल्या लोंबकळणाऱ्या ट्युबलाइट, तुटलेले बाथरूमचे दरवाजे, शितपेटी, स्वच्छतेची अनियमितता, औषधांची कमतरता यासह इतरही समस्या रुग्णालयात मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहेत, तर एका खासगी सिक्युरिटी कंपनीच्या माध्यमातून पेण उपजिल्हा रुग्णालयाच्या साफसफाईचा ठेका सुरू आहे. येथे साधारणपणे सात कर्मचारी साफसफाई करत असल्याचे कंत्राटदार यांनी सांगितले आहे, मात्र प्रत्यक्षात तीनच कर्मचारी कार्यरत असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे रुग्णालयात सर्वत्र स्वच्छतेचा अभाव दिसून येत आहे.

# मिरा भाईंदर मेट्रो प्रकल्पास गती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर** - मिरा भाईंदर मेट्रो प्रकल्प ९ मधील भाईंदर पूर्व-पश्चिम परिसराला जोडणाऱ्या उड्डाणपुलाखालील रेल्वे रुळावरून अखेर मेट्रोचा पूल देखील उभारण्यात आला आहे. हे काम पूर्ण झाल्यामुळे मेट्रोच्या कामास गती मिळणार असल्यास दावा करण्यात येत आहे.

मागील पाच वर्षापासून मिरा भाईंदर शहरात 'दहिसर भाईंदर मेट्रो मार्गीका ९' उभारणीचे काम प्रगतीपथावर सुरू आहे. सध्या या प्रकल्पाचे स्थापत्य काम जवळपास ९० टक्के पूर्ण झाले असून मेट्रो स्थानक व मार्गीकचे काम पूर्ण केले जात आहे. यात आता कामाचे विभाजन करून दहिसर ते काशिगाव पर्यंत टप्पा एक आणि काशिगाव ते भाईंदर पश्चिम येथील नेताजी सुभाष



चंद्र बोस मैदान हा दुसरा टप्पा ठरवण्यात आला.

यावरून टप्पा एकसाठी नुकतीच मेट्रो चाचणी पूर्ण झाली असून येत्या डिसेंबर अखेरीस या मार्गावर मेट्रो धावणार आहे. तर दुसऱ्या टप्प्याचे काम देखील प्रगती पथावर सुरु आहे. यात सुभाष चंद्र भोस मैदानापर्यंत मेट्रो घेऊन जाण्यासाठी भाईंदर पूर्व-पश्चिम परिसराला जोडणाऱ्या उड्डाणपुलाखालील रेल्वे रूळ देखील ओलांडावा लागणार होता. त्यानुसार मागील तीन दिवस रात्रीच्या वेळेस काम करून हा पूल उभारण्यात आला आहे.

रेल्वे रुळावर पूल उभारण्यासाठी एमएमआरडीए प्रशासनाने स्टील गर्डरची उभारणी केली आहे. तर अन्य ठिकाणी सिमेंटचे गर्डर उभारण्यात आले आहेत. प्रामुख्याने हे ३ स्टील गर्डर आहेत. हे बसवण्यासाठी ७ जून ते ९ जून दरम्यान तीन दिवस रेल्वे ब्लॉक व वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आला होता. तर या प्रसंगी रेल्वे, एमएमआरडीए स्थानिक पोलिस, अग्निशमन कंत्राटदार जे. कुमार यांचे कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते. महत्वाची बाब म्हणजे हे काम पाहण्यासाठी नागरिकांनी देखील मोठी गर्दी केली होती

## जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली

# जिल्हा रुग्णालयात पोषणयुक्त आहार जनजागृती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** 'व्यायाम हे शरीरासाठी ज्ञान असेल, तर सकस आहार हे चांगले संस्कार आहेत,' या विचारातून ठाण्यातील वि.सा. सामान्य रुग्णालय येथे 'आहाराचे आरोग्य' या नाविन्यपूर्ण उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं. LHV प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनींच्या "Nutrition Lab" च्या माध्यमातून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी हा जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला.

जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमात अळीवाची खीर, नाचणीची चकली, बाजरीचे अप्पे, पौष्टिक ढोकळा, मेथीचे बिना साखरेचे



लाडू अशा पारंपरिक व पौष्टिक पदार्थांचं सादरीकरण करण्यात आलं. आहारात विविध घटकांचा समावेश कसा करावा, हे तंतोतंत समजावण्यात आलं. पदार्थांची माहिती देतानाच त्यांचे आरोग्यावर होणारे परिणामही स्पष्ट करण्यात आले. या उपक्रमाला अति. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धिरज महंगाडे व निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. मृणाली राहूड, शुश्रुषा महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती श्रद्धा मेस्त्री व त्यांच्या टीमने कार्यक्रमाचं उत्कृष्ट नियोजन केलं.

यावेळी डॉ. संगीता माकोडे, डॉ. निशिकांत रोकडे, डॉ. कल्पना माले व अधिसेविका श्रीमती मंजुळा घाणे यांनी पदार्थांची प्रत्यक्ष चव घेऊन उपस्थितांना मार्गदर्शन केलं. पाककला आणि त्यामागील कृती, पोषणमूल्ये, आणि आरोग्य दृष्टिकोन यावेळी स्पष्ट करण्यात आला. अशा उपक्रमांमुळे आरोग्याचं भान वाढतं, जनजागृती होते आणि रुग्णांशी अधिक सकारात्मक संवाद घडतो,अशा भावना मान्यवरांनी व्यक्त केल्या.

# डोंबिवलीत एसी लोकलचे दार बंद करण्यासाठी प्रशासनाची धावपळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** मुंबईतील सर्वच लोकलचे दरवाजे स्वयंचलित करण्याचा धक्कादायक निर्णय रेल्वे प्रशासन एकीकडे घेत असताना दुसरीकडे मात्र डोंबिवली रेल्वे स्थानकात मंगळवारी सकाळी वातानुकूलित लोकल चे दरवाजे गर्दीमुळे बंद होत नसल्याचा प्रकार उघडकीस आला.

काल कल्याणहून सीएसएमटी स्थानकाकडे जाणाऱ्या लोकलमधून पडून



अनेक प्रवाशांचा मृत्यू झाला. दोन लोकल एकमेकांना घासल्या. त्यामुळेच बाहेर लटकलेले प्रवासी खाली पडले. यात काहीजणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना घडून गेल्यानंतरही अजूनही रेल्वे प्रशासनाला जाग आलेली नाही. आता एसी लोकलचे दरवाजे बंद होत नाहीयेत.आज डोंबिवली येथे एका एसी लोकलचा दरवाजा तब्बल १० मिनिटे उघडाच होता. प्रवाशांच्या गर्दीमुळे हा दरवाजा बंद होत नव्हता. आज सकाळी ८ वाजून ५९ मिनिटांनी निघणाऱ्या ट्रेनमध्ये ही घटना घडली आहे. कालच्या घटनेनंतर सर्वच लोकलचे दरवाजे बंद करण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, आता जर प्रवाशांच्या गर्दीमुळे लोकलचे दरवाजेच बंद होणार नसेल तर याचा काहीच फायदा नाही. आरपीएफच्या जवानांनी जेव्हा प्रवाशांना खेचून बाहेर काढले त्यानंतर या एसी लोकलचे दरवाजे बंद झाले. तब्बल १० मिनिटे ही ट्रेन तिथेच उभी होती.

# उल्हासनगरात तीन दुकाने उध्वस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर, ता. ९ (वार्ताहर) :** शहरातील रस्त्यांना मोकळा श्वास देण्यासाठी महापालिकेने अखेर कठोर पावले उचलली आहेत. एकीकडे रस्ते रुंदीकरणासाठी स्थानिक प्रशासन झगडत असताना, दुसरीकडे नाल्यावर बेकायदा उभ्या केलेल्या दुकानांचा अडथळा महापालिकेच्या मार्गात ठाण मांडून होता. त्यामुळे अखेर राजकीय हस्तक्षेप, स्थानिक दबाव आणि वेळोवेळी पाठवलेल्या नोटिशी झुगारून जेसीबीच्या गडगडाटात तीन दुकाने जमीनदोस्त करण्यात आली. उल्हासनगरातील पंजाबी कॉलनी परिसरातील नाल्यावर बेकायदा तीन दुकाने उभी करण्यात आली होती. अखेर उल्हासनगर पालिकेने पोलिस बंदोबस्तात तीनही दुकाने जमीनदोस्त केली. गेल्या अनेक महिन्यांपासून रस्ते रुंदीकरणाच्या कामात अडथळा ठरत असलेली ही दुकाने काही राजकीय हस्तक्षेपामुळे वाचली होती. मात्र पालिका आयुक्त मनीषा आव्हाळे यांच्या आदेशानुसार सहाय्यक आयुक्त गणेश शिंपी, मनीष हिवरे यांच्यासह महापालिका पथकाने जेसीबीसह घटनास्थळी दाखल होताच प्रशासनाने कोणतीही तडजोड न करता ही अतिक्रमणे हटवली.



# जलवाहिनी फुटल्याने कल्याण पश्चिमेत दोन दिवस पाणी बाणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता • भिवंडी : कल्याण : कल्याण पश्चिमेतील मोहम्मद अली चौक परिसरात सोमवारी सकाळी केडीएमसीची पाण्याची पाईपलाईन फुटल्याच्या घटनेमुळे गेले दोन दिवस कल्याण पश्चिमेत पाणी बाणी समस्या निर्माण झाल्याने पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ महिला वर्गावर आली.

कल्याण पश्चिमेतील मोहम्मद अली चौकात सिमेंट काँक्रीट रस्त्याखालील साडे पाचशे एमएम व्यासाची पाण्याची लाईन फुटल्याची घटना सोमवारी सकाळी घडल्याने कल्याण पश्चिमेतील पाणी पुरवठा न झाल्याने दोन दिवस पाणी बाणी समस्या निर्माण झाली. वटपौर्णिमा महिलांच्या सणाच्या दिवसाला पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ आली. कल्याण पश्चिम परिसराचा पाणीपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना त्रस्त झाल्याचे यानिमित्ताने दिसून आले.

कल्याण पश्चिमेतील महमंद अली चौक परिसरात काँक्रीटच्या रस्त्या खालील पाईपलाईन फुटली असून केडीएमसी पाणी पुरवठा विभागाकडून युध्द पातळीवर दुरूस्तीचे काम सुरू असून मंगळवारी रात्री नऊ वाजेपर्यंत दुरूस्ती काम पूर्ण होईल. रात्री अकरा वाजेपर्यंत पाणी पुरवठा सुरू होईल अशी माहिती कार्यकारी अभियंता अशोक घोडे यांनी दिली.



## पळसोली येथे भात लागवडीविषयी कार्यशाळा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : मौजे पळसोली येथे दिपक बाळू चव्हाण यांच्या मयंक दिपक चव्हाण कृषी पर्यटन केंद्रामध्ये यंत्र व साच्याच्या साह्याने भात लागवड विषयी (भाताची टोकणनी ) या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कल्याण तालुका कृषी विभागाच्या वतीने हि कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. भातशेती शुन्य मशागत तंत्रज्ञान (एसआरटी) या पद्धतीने भात लागवड करणाऱ्या येथील शेतकऱ्यांना आगामी खरीप हंगाम लागवडीसाठी यंत्र व साच्याच्या साह्याने भात लागवड विषयी (भाताची टोकणनी ) या विषयी माहितीपर मार्गदर्शनासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर, शेतकऱ्यांनी मजूर मिळत नसल्याने एसआरटी शेतीकडे वळले पाहिजे या शेतीमुळे जमीन मशागत, बियाणे, खते, मजूर इत्यादी गोष्टीचा खर्च कमी होतो व उत्पादन वाढण्यास मदत होते असे सखोल मार्गदर्शन सहाय्यक कृषि अधिकारी प्रसाद भोकरे यांनी तर पेरणी यंत्र वापरून शेती केली पाहिजे व मजूर उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांनी या यांत्रिकीकरणाकडे वळून बियाणे व खते व्यवस्थापन याबाबत उपकृषी अधिकारी विजय पाटील यांनी मार्गदर्शन केले.

त्याचबरोबर जमीन आरोग्य पत्रिका महत्त्व, माती नमुना कसा घ्यावा याबाबत सविस्तर माहिती तालुका तंत्र व्यवस्थापन वैशाली भापसे यांनी दिली तर गेल्या मागील वर्षापासून या भातशेती शुन्य मशागत तंत्रज्ञान (एसआरटी) या पद्धतीने भातशेती व कडधान्य शेती करीत आहे. त्यामुळे मजूर, मेहनत व खतांची बचत झाली आहे असे अनुभव शेतकरी दीपक चव्हाण यांनी सांगून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या शेतीकडे वळावे असे आव्हान त्यांनी केले.

या कार्यशाळावेळी प्रगतशील शेतकरी ज्ञानेश्वर चौधरी, चंदन कडव, पुंडलिक चौधरी, जयवंत दिवाणे, शरद दिवाणे, भास्कर दिवाणे, शिवाजी चौधरी, तेजस तारमळे, शेतीनिष्ठ शेतकरी श्रीराम पालवी आदी एसआरटी भात लागवड, पट्टा पद्धत, यंत्राद्वारे लागवड व प्रगतशील शेतकरी उपस्थित होते.

# 'टोमणेसम्राटांची नव्हे तर हिंदुहृदयसम्राटांची शिवसेना'

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उबाठावर खरमरीत टीका

### डबल महाराष्ट्र केसरी पैलवान चंद्रहार पाटील यांचा शिवसेनेत प्रवेश



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


ठाणे : तीन वर्षांपूर्वी उठाव झाल्यानंतर आपल्यावर दररोज आरोप झाले, पण मुख्यमंत्री असताना आरोपाने नाही तर कामातून उत्तर दिले. त्यामुळेच महाराष्ट्रातील जनतेने या कामांना ऐतिहासिक प्रतिसाद दिला आणि महायुतीच्या २३२ जागा निवडून आल्या. ही शिवसेना हिंदुहृदयसम्राटांची शिवसेना आहे टोमणेसम्राटांची नाही, अशी खरमरीत टीका शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उबाठावर केली. सांगली जिल्ह्यातील उबाठाचे पदाधिकारी डबल महाराष्ट्र केसरी पैलवान चंद्रहार पाटील यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत आज शिवसेनेत प्रवेश केला. या पक्षप्रवेश सोहळ्यात उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी मंत्री उदय सामंत, आमदार सुहास बाबर, शिवसेना सचिव राम रेपाळे, दिपाली सय्यद उपस्थित होते.

चंद्रहार पाटील यांचे पक्षात स्वागत करताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की नकली आखाड्यातून आज खऱ्या आखाड्यात आलात. पैलवान पाटील हे कुटील माणसाकडून स्वच्छ मनाच्या माणसाकडे आले आहेत. चंद्रहार पाटील यांनी मराठी मातीचा खेळ असलेल्या कुस्तीला लौकिक मिळवून दिला. पैलवान हे महाराष्ट्राचे वैभव आहे. मी जरी पैलवान नसलो तरी २०२२ मध्ये समोरच्या लोकांना चारीमुंड्या चीत केले. तेव्हा असे डावपेच टाकले की ते अद्याप उठले नाहीत. पैलवानांना डावपेच माहित असतात. कुस्तीला बळ देण्यासाठी त्याला राजकीय पाठिंबा आवश्यक आहे. चंद्रहार पाटील यांचा आखाडा मंत्री उदय सामंत यांनी बघितला आहे. चंद्रहार पाटील यांचा संकल्प पूर्ण करण्याची जबाबदारी शिवसेनेची आहे, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिली. महाराष्ट्रातील प्रत्येक तालीम आपल्याला जोडायची आहे, असे ते म्हणाले. मी देखील शेतकऱ्याचा मुलगा शाखाप्रमुख ते राज्याचा मुख्यमंत्री झालो. पण अजूनही काहीजणांना पचनी पडत नाही. त्यांची पोटदुखी दूर करण्यासाठी राज्यात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरु केलाय. हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे, इथं कोणी मालक नाही. बाळासाहेब सहकाऱ्यांना सवंगडी समजायचे मात्र त्यांच्यानंतर काही लोक अहंकारामुळे सहकाऱ्यांना घरगडी समजू लागले, अशी टीका उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उबाठावर केली.

ते पुढे म्हणाले की, पहलगाममध्ये आपल्या लाडक्या बहिणींचे कुंकू पुसण्याचे काम पाकिस्तानने केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आपण ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानला धडा शिकवला. सरकारची सात शिष्टमंडळे जगभरात गेली आणि त्यातील एका शिष्टमंडळाचे नेतृत्व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केले. सीमेवरील जवानांसाठी दिल्लीत रक्तदान शिबीर घेण्याचा संकल्प चंद्रहार पाटील यांनी केलाय. त्यांची देशभक्ती पाहता दिल्लीत काय काश्मीरमध्ये रक्तदान शिबीर घेऊ, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. ज्या विश्वासाने तुम्ही शिवसेनेत आला आहात तुमची जबाबदारी वाढली आहे. घराघरात शिवसेना पोहोचवायची आहे, असे ते म्हणाले.

प.पू.स. रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता.शहापूर, जि.ठाणे

देवाने दिलेली देणगी हेच स्वतःचे कर्तुत्व वाटणे हा अहंकार. हा अहंकार जीवनाची माती करतो. माणसाचे अस्तित्व ईश्वराच्या सतपासून निर्माण झाले आहे. त्याच्या बुद्धीतील शक्ती, ज्ञान मिळवण्याची तळमळ ही ईश्वराच्या चितपासून निर्माण झाली आहे. तसेच जीवाचे स्वतःवर असणारे प्रेम हे ईश्वराच्या सुखदुःख विरहित अशा आनंदापासून निर्माण झाले आहे. म्हणूनच ईश्वराला सच्चिदानंद म्हटले आहे व माणसाने पण त्याच स्वरूपात राहावे ही त्याची इच्छा आहे. पण होते काय? याच गोष्टीचे नेमके विस्मरण झाल्यामुळे माणसाला हे आपले स्वयंभू गुणधर्म आहेत असे वाटून अहंकार निर्माण होतो.


गुरूमाऊली :- प.पू.स. अलोकनाथजी महाराज

# 'डोळ्यांवर बोलू काही' पुस्तकाचे प्रकाशन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : जागतिक नेत्रदान दिवसाचे औचित्य साधून अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठान, द फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशन आणि जायंटस ग्रुप ऑफ कल्याण मेन आणि सहेली यांचे वतीने नेत्रदान विषयक जागृती निर्माण व्हावी याविषयी एका अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये नेत्रदानाची जागृती निर्माण व्हावी आणि त्यांच्या मार्फत कुटुंबामध्ये याविषयी प्रचार प्रसार व्हावा या उद्देशाने डोळ्यांवर बोलू काही या डॉ विंदा भुस्कुटे लिखित पुस्तकाचे प्रकाशन व त्यावर आधारित प्रश्नमंजुषा उपक्रमाचे उद्घाटन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. या पुस्तकाला शुभेच्छा देताना अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड म्हणाले की, " डॉ विंदा भुस्कुटे यांच्या लेखणीतून साकारलेल्या या छोटेखानी पुस्तकात डोळे या विषयावरील वेगवेगळ्या पैलूंवर मुलांना समजेल अशा शब्दात प्रकाश टाकण्यात आला आहे. मुलांप्रमाणे कुटुंबातील प्रत्येक सदस्यांनी या पुस्तकाचे वाचन करून दृष्टीदान या विषयाचा प्रसार करावा."

या प्रसंगी पुस्तकाच्या लेखिका व शिक्षण सेवाव्रती डॉ विंदा भुस्कुटे, अवयवदान चळवळीचे प्रसारक व द फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशन संस्थेचे पदाधिकारी नागराजन अय्यर, जायंटस ग्रुप ऑफ कल्याण मेनचे सुरेशभाई सूचक, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे, अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठानचे सचिव व संपादक हेमंत नेहते आदी मान्यवर उपस्थित होते. अखंड वाचन यज्ञचे प्रणेते व अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ योगेश जोशी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या पुस्तकावर आधारित शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात येणार आहे.

हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य असून सर्व सहभागी विद्यार्थ्यांना इ प्रमाणपत्र देण्यात येणार आहे व विजेत्यांना अखंड वाचन यज्ञ उपक्रमात पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी व विनामूल्य ई पुस्तक प्राप्त करण्यासाठी हेमंत नेहते ८७७९६४४९९२ यांच्याशी संपर्क साधावा.

# मुरबाड तालुक्यात वटपौर्णिमा उत्साहात साजरी

## वडाच्या झाडाला महिलांनी सात फेऱ्या मारुन जन्मोजन्मी हाच पती मिळावा केली मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुरबाड : मुरबाड तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागात तसेच आदिवासी पट्ट्यात वटपौर्णिमा हा महिलांसाठी विशेष सण मानला जात आहे. परंतु दरवर्षी वट पौर्णिमेचे औचित्य साधून पावसाचे वातावरण असते परंतु यंदा चक्क कडक ऊन पडल्याचे चित्र दिसून आले. कारण मे महिन्यातच भरपूर प्रमाणात पाऊस पडला आहे. मंगळवारी वटपौर्णिमेच्या दिवशी चक्क कडक ऊन पडल्याचे चित्र दिसून आले.

त्याच धर्तीवर आज विविध ठिकाणी रस्त्याच्या कडेला तसेच विविध ठिकाणी वडाच्या झाडाला मुरबाड ग्रामीण भागात तसेच आदिवासी पट्ट्यात व मुरबाड शहरी भागातून हजारो महिलांनी सकाळी ११.३० ते २ च्या दरम्यान वडाच्या झाडाला सात फेऱ्या मारून असाच जन्मोजन्मी हाच पती मिळावा अशा प्रकारच्या मागण्या महिलांनी केल्या.





कल्याण ग्रामीण १४४ चे आमदार राजेश गोवर्धन मोरे आणि त्यांच्या सौभाग्यवती भारती राजेश मोरे यांनी सर्व महिलांना वटसावित्री पौर्णिमा सणाच्या शुभेच्छा दिल्या आणि सौभाग्यच लेण असलेले हळदी कुंकवाचा करंडा वाटप करण्यात आले.

# मूल्यमापनासाठी पाठयपुस्तक हे साधन आहे - डॉ. संजय वाघ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




ठाणे : प्रशिक्षणाचे स्वरूप बदलले असल्याने व विविध तांत्रिक आडचणी निर्माण झाल्यामुळे वेळ मिळाला नाही. वर्गातील अंतक्रिया समृद्ध झाली पाहिजे. त्याच बरोबर सर्वांनी तांत्रिक बाबी संभाळाव्यात. प्रत्येकाचे ध्येय साध्य झाले पाहिजे. दररोजची परीक्षा थांबवली आहे. परंतु मुल्यमापन आवश्यक आहे. मूल्यमापनासाठी पाठयपुस्तक हे साधन आहे. प्रत्येकाने क्वालिटी डेवलफ केली पाहिजे त्यासाठी आऊट सोर्सेसचा वापर करावा. त्याचबरोबर विषयाचा समन्वय साधता आला पाहिजे.शिक्षणातून मूल्य व वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. प्रत्येकाला अधिकार आणि कर्तव्याची जाणीव आसली पाहिज. शेवटच्या दिवशी होणाऱ्या परीक्षेचे स्वरूप बदलू शकते. संवेदनशिलता आपल्यामध्ये निर्माण करून शाळा आणि घर याची सांगड कशी घालता येईल यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. आपल्या सर्व समस्या वरिष्ठांचे निदर्शनास आणून दिल्या आहेत. असे प्रशिक्षणार्थींशी संवाद साधताना शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ठाणेचे प्राचार्य डॉ. संजय वाघ यांनी सांगितले.

एम. एच. हायस्कूल, ठाणे येथे दिनांक 2 ते 12 जून 2025 या कालावधीत वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.09 जून 2025 रोजी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ठाणेचे प्राचार्य डॉ. संजय वाघ यांचे समवेत ठाणे केंद्र समन्वयक वरीष्ठ अधिव्याख्याता भगवान खारके, अधिव्याख्याता डॉ. प्रभा खरटमोल सह सर्व प्रशिक्षण वर्गाचे सुलभक यांनी प्रशिक्षणार्थींच्या समस्या समजावून घेतल्या व मार्गदर्शन केले. मराठी भाषा वगळता इतर भाषांचे पुस्तकांची प्रशिक्षणार्थींनी मागणी केली होती. त्या सर्व प्रशिक्षणार्थींना सर्व भाषांची संदर्भीय पुस्तके वाटप करण्यात आली. सुलभकांनी सर्वांचे आभार मानले.

# डोंबिवलीत निळा पाऊस पडलाच नाही

## कामा संघटना आणि सामूहिक सांडपाणी प्रकिया केंद्राच्या पदाधिकाऱ्यांनी केली पाहणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



डोंबिवली : डोंबिवलीत निळा पाऊस पडल्याची वार्ता पसरताच नागरिकांमध्ये चर्चा सुरु झाली होती. मात्र हे निळे पाणी नसून एका टेम्पो मधून पडत असलेले निळे रंगाचे पाणी असल्याचे कामा संघटनेचे अध्यक्ष राजू बेल्लूर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

याबाबत अधिक माहिती देताना कामा संघटनेचे अध्यक्ष बेल्लूर म्हणाले, डोंबिवली फेस - 2 ला निळे रंगाचे पाणी असल्याचे दिसले होते.हे कुठल्याही कंपनीचे निळे पाणी नसून येथे एक टेन्पो उभा होता त्यातून निळ्या रंगाचे माल वाहतूक केली होती.टेम्पो रिकामा करून वाहकाने त्याठिकाणी उभा केला होता. त्यातील निळा रंग टेन्मोच्या आजूबाजच्या रस्त्यावर पडला. मात्र दुसऱ्या दिवशी पाऊस पडल्याने निळा रंग वाहून गेला.त्यामुळे हा निळा रंग म्हणजे कुठल्याही प्रकारचे रासायनिक केमिकल नाही. रस्त्यावर निळे रंगाचे पाणी पडत असल्याची माहिती मिळताच कामा संघटनेचा अध्यक्ष म्हणून मी आणि सामूहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे प्रमुख पदाधिकाऱ्यांनी यांनी सदर ठिकाणी पाहणी केली. येथील निळे पाणीही तपासले असता त्या पाण्यात रासायनिक केमिकल नसल्याचे दिसून आले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A. / B.Com. / B.Sc. CHEMISTRY / B.Sc. MATHS / BAF / BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY / M.Com. ADVANCED ACCOUNTANCY / M.A. MARATHI / M.A. ECONOMICS / M.A. SOCIOLOGY / M.A. HISTORY


Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111

# डॉ. राजु राम 'महाराष्ट्र प्रतिभा सन्मान पुरस्कारा'ने सन्मानित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : स्वराज्य प्रतिष्ठान आणि धडक कामगार युनियन महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या भव्य पुरस्कार वितरण समारंभात कल्याणचे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते, भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तसेच "बेटी बचाओ बेटी पढाओ अभियान" चे महाराष्ट्र राज्यातील सक्रिय सहसंयोजक अ‍ॅड. डॉ. राजु राम यांना "महाराष्ट्र प्रतिभा सन्मान पुरस्कार २०२५" प्रदान करण्यात आला.

सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय व राजकीय क्षेत्रातून उल्लेखनीय व सातत्यपूर्ण समाजकार्य करत उपेक्षित, गरीब, गरजू, निराधार, अनाथ व वंचित मुले व विधवा महिला, जेष्ठ नागरीक घटकांना मदतीचा हात देत त्यांच्या पुनर्वसनासाठी झटणाऱ्या, तसेच "बेटी बचाओ बेटी पढाओ अभियान" अंतर्गत मुलींच्या हक्क रक्षणासाठी आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी विशेष कार्य करणाऱ्या अ‍ॅड. डॉ. राजु राम यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना हा बहुमान देण्यात आला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नेत्रतज्ज्ञ पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांच्या हस्ते डॉ. राजु राम यांना गौरवचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

या सोहळ्याला अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पदाधिकारी व विविध क्षेत्रातील मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी डॉ. तात्याराव लहाने यांनी आपल्या भाषणात सांगितले की "समाजासाठी निरंतर कार्य करणाऱ्या व्यक्तींना अशा पुरस्कारांद्वारे प्रोत्साहन मिळते. डॉ. राजु राम यांचे सामाजिक व 'बेटी बचाओ बेटी पढाओ' अभियानातील कार्य समाजासाठी प्रेरणादायी असून, नव्या पिढीसाठी आदर्श ठरेल."

यावेळी ॲड. डॉ. राजु राम यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "हा सन्मान माझ्या वैयक्तिक यशाचा नसून, समाजाच्या हितासाठी काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचा आहे. विशेषतः 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या अभियानासाठी हे एक मोठे बळकटीकरण आहे. हा पुरस्कार मला अधिक जबाबदारीने समाजासाठी व मुलींच्या हक्कांसाठी कार्य करण्याची प्रेरणा देतो." या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे कामगार नेते अभिजित राणे, डॉ. शितल मालूसरे, प्रमोद पाटील, संभाजीराव जाधवराव, आयोजन समाजसेवक सुरज भोईर, समाजसेविका ॲड शिल्पा राम तसेच महाराष्ट्रातील सर्वच क्षेत्रातील असंख्य सामाजिक, सर्वच पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | अभ्यासक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024